तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादक मंडळ :

मिनाक्षी जयकर

मयुरा नायक

संजना कोठारे

वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



**वर्ष ८५ वे) प्रभुतरुण मुंबई, रविवार, ता. १६ माहे ऑगस्ट, सन २००९ (अंक ९६३**


*संपादकीय*

## पानभरून

**-सुहासिनी कीर्तिकर**



**पुण्यस्मरण**

शेजारचं झाड अगदी गर्द बहरून उभं होतं. पानन्पान हिरवंकंच. कवडशांनी लळा लावावा अशी मधूनच कुठेशी पानांची जाळी. चांदणं त्या जाळीतून डोकवण्यास अधीर. कवडसे अन् चांदण्यांची झिलई पानापानावर चढलेली. 'मन अजून' झुलवत ठेवणारी. शेजारधर्म पाळत झाडानं पानांची चवरी माझ्याही खिडकीशी झुलती ठेवली होती. मग मला किती किती पानांची कहाणीच त्या पानांवर वाचायला मिळाली. पु. शि. रेग्यांच्या कवितेतला 'चवरी ढाळणारा शेवगा' आठवला. या कवीची जन्मशताब्दी १९१० मध्ये येईल. तेही आठवलं. हाच कवी आम्हाला बटबटीत डोळ्यांनी खुटखुटीत अर्थशास्त्र शिकवायचा. आधी विद्यार्थिनी म्हणून अन् नंतर सहकारी म्हणून या माणसानं मला खूप काही दिलं; तेही आठवलं. आयुष्याच्या भूतकाळाची पानं अशी फडफडली. हं! तर काय? 'चवरी ढाळणारा शेवगा' वरून मी कुठं पानंच्या पानं मागे गेले ना! शेवग्याची गोल छोटी पानं जणू आकाश विणत जातात. हे विणकाम करणारी सृष्टी माणसाला किती भरभरून देत असते. य.गो.जोशी यांच्या एका कथेतली मुलं शेवग्याच्या पानांची छत्री पालखीवर धरून खेळत असतात. लेखक तेथे म्हणतो, 'त्यांच्या भावनेचा ज्ञानोबा त्या पालखीत बसला होता.' खरंच. मुलं असो वा इतर कुणी 'भावनेचा ज्ञानोबा' असला की शेवगा शेवगा राहात नाही. तो पानांची छत्री धरतो. चवरी ढाळतो. स्वयंपाकघरात शिरून रूचीही वाढवतो.

पानांचे तरी किती किती आकार, उकार आणि सळसळींचे प्रणव. पिंपळाच्या पानांची सळसळ तर विविध अंगानं रूपं धारण करते. सोसाट्याचा वारा आला की ही पानं पिंगा घालतात. नाचतात. आपल्या टोकदारपणाला एक लय देतात. कातरवेळ झाली की कुणाची तरी सय काढतात. 'कातर-वेळेवरती थबकून ऐकतील जर पिंपळपाने, उत्तरातला कडू गोड मध शोषतील ती तीक्ष्ण सुईने' अशा इंदिराबाईंच्या ओळींतून त्यांच्या टोकांच्या सुया कडू गोड मध शोषतात. अंधारलेल्या रात्री हीच पानं स्तब्ध होत जणू दबा धरून बसतात. त्यांचा एक अंधार पांघरलेला बागुलबोवाच तयार होतो. मुंजा त्यावर बसल्यासारखा भेडसावतो. पण अंधाराला पूर्णविराम देत पूर्णत्वाचा प्रत्यय देणारी सकाळ प्रसन्नपणे हसली की मग? मग उगवत्या सूर्याच्या साक्षीनं हीच पानं कोवळ्या उन्हात न्हाऊन निघतात. उन्हाशी, प्रकाशाशी हितगुज करत अक्षरश: सोन्याची बनतात. आत्मप्रचिती देणारा ज्ञानदेवांचा 'सोन्याचा पिंपळ' तो हाच.

या पिंपळाच्या शेजारीच बहुधा वस्ती करणाऱ्या वडाच्या पानांनाही

(पान २, कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## ''मैत्र जीवाचे''

**- मिनाक्षी जयकर**

चाळीशी! हल्ली वयाची चाळीशी पूर्ण करणे ही एक सर्वसाधारण बाब झाली आहे. पण हीच चाळीशी एखाद्या प्रकल्पाची किंवा मोहिमेची असेल तर? विशेषत: अशा मोहिमेची जी मानवी उत्क्रांतीच्या इतिहासाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. NASA ची चांद्रयान मोहिम! मानवाने चंद्रावर पहिले पाऊल टाकल्याला यंदा २० जुलै रोजी चाळीस वर्ष झाली. तेव्हा आजच्याप्रमाणे टेलिव्हिजनचं जाळं नव्हतं. आज अशा घटना आपण आपल्या घरात टी.व्ही किंवा कॉम्प्युटरसमोर बसून बघू शकतो. चाळीस वर्षापूर्वी हे शक्य नव्हते. पण त्यामुळे लोकांच्या उत्साहात काही बाधा आली नाही. ठिकठिकाणच्या वेधशाळांसमोर लोकांनी किती मोठ्या रांगा लावल्या होत्या. त्या आठवणींना एवढ्या वर्षांनंतर पुन्हा उजाळा मिळाला. मानवाचे हे ऐतिहासिक पाऊल. ''याचि देही याचि डोळा'' पाहणारे धन्य होत.

चाळीस वर्षांपूर्वी या दिवशी आता-पर्यंत केवळ कविकल्पना असलेली गोष्ट प्रत्यक्षात घडत होती. आणि त्याचबरोबर ''चंद्रा''वरची कवींची मक्तेदारी धोक्यात येत होती. यापूर्वी एखाद्या सुंदर तरुणीच्या चेहऱ्याकडे बघून त्याला चंद्राची उपमा देण्याची प्रथा होती. या चांद्रमोहिमेमुळे दुरून जरी चंद्र मोहक दिसत असला तरी वास्तवात त्याचा पृष्ठभाग कसा आहे याचे ज्ञान आबालवृद्धांना झाले आणि सुंदर तरुणीच्या मुखड्याला ''चाँदसा रोशन चेहरा'' म्हणण्याची पंचाईत झाली.

ही चांद्रमोहिम जरी अमेरिकेच्या अधिपत्याखाली झाली तरी अमेरिकन माणसाप्रमाणेच जगभरातील लोकांनाही ती तितकीच रोमांचक होती. आणि जे प्रत्यक्षात त्या मोहिमेत सहभागी होते त्यांच्याकरता? त्यांनी त्यांच्या ऐन उमेदीच्या काळात प्रत्यक्ष चंद्रालाच गवसणी घातली होती. या मोहिमेत नील आर्मस्ट्राँगच्या (Neil Armstrong) बरोबरीने सहभागी झालेल्या बझ आल्डरिनने (Buzz Aldrin) म्हटल्या-प्रमाणे, ''चंद्रावर पाऊल ठेवणे एकवेळ सोपे होते. पण त्यानंतरच्या आयुष्यात करायचे काय? हा एक यक्ष प्रश्न होता.''

चंद्रावर जाऊन आल्यावर नील आर्मस्ट्राँग चंद्रावरची माती घेऊन मुंबई भेटीवर आला होता. त्यावेळी त्याच्या स्वागताकरता जनसागर लोटला होता; जणू काही आपलाच कुणी सखा चंद्रावर स्वारी करून स्वगृही परतत आहे अशा उत्साहात सर्व होते. अशावेळी ज्ञानेश्वरांनी सांगितलेली विश्वबंधुत्वाची भावना प्रकर्षाने जाणवते. नुकत्याच झालेल्या 'फ्रेंडशीप डे'च्या पार्श्वभूमीवर ह्या जगाच्या मैत्रीचीही आठवण झाली. ह्या मैत्रीप्रमाणेच ''प्रभुतरुण', 'युवामंच' आणि तुम्हा-आम्हा सर्वांचे मैत्र असेच वृद्धिंगत होवो या शुभेच्छा! ''परस्परां जडो मैत्र जीवाचे!'

### खूषखबर

प्रभुतरूणाची वेबसाईट नव्याने सुरू झाली आहे. रु. १०००/- भरून आजीव सदस्य व्हा आणि 'ऑन लाइन' प्रभुतरुण नियमित वाचा. पोष्टाचा होणारा विलंब टाळा. वर्गणी कृपया डॉ. सुरेखा बन्सी धुरंधर
नानी निवास,
दिक्षीत रोड, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई-५७ या पत्त्यावर पाठवावी.
वेबसाईट: www.prabhutarun.com

(पान१, कॉलम २ वरून)

जाड कसदारपणा असतो. पिंपळपाने रेषा न् रेषा स्पष्ट करणारी. जाळीदार खुणा पुस्तकाच्या पानांतून जपणारी. कधी त्यावर कृष्णराधेची सुरेख चित्र सामावून घेणारी. आठवणी जपणारी. वड तितका अवखळ नाही. त्याची पानं जाड अन् रेषा झाकून माणसाकडं पाहाणारी. त्याची नड भागवण्यासाठी चीक गाळणारी. पिंपळ काय; वड काय; ऋतूमागून ऋतू वाचत वाचत आपली पानं कोवळी तांबूस करतात तेव्हा आजोबांनी खांद्यावर तान्ह्या मुलाला खेळवल्यासारखंच वाटतं. (मी नुकतीच पुन्हा आजी झाल्यानं कोवळ्या पानांचं हे तान्हेपण मला फार फार गोजिरं वाटतंय!) माणसंही झाडापानांच्या, देठाफुलांच्या संगतीनं असं तान्हेपण मिरवतात. हळुहळू वयात येणाऱ्या पानांबरोबर टिपऱ्या खेळतात. त्यांना आपली बाळलेणी बहाल करत त्यांचे विणलेले द्रोण करतात. पत्रावळ्या करतात. पानांच्या संगे रंगत रंगत पुढं याच 'पानवठ्या'वर आपला शृंगारही सजवतात. शृंगार करण्यासाठी मग 'तुरे खोवती मस्तकी पल्लवांचे' मागे पडते अन् हीच सुंदर सुंदर आकारलेली पाने शेपट्यावर, खोप्यात माळली जातात. मेंदीच्या पानांचा रंग नक्षीदार बनत हातापायांवर चढतो. त्या पानांवर मन सरसरून चढतं, बहरतं.

अन् बालपण, तारुण्यावस्था मागे टाकली की हीच पानं नियतीचा कायदा आपल्याला शिकवतात. कुसुमाग्रजांच्या 'पाचोळा' कवितेतली पिवळी पानं तरी काय वेगळं सांगतात? 'पुन्हा पडण्या वरतून पर्णराशी' खाली साचलेल्या जीर्णशीर्ण, रसहीन-रंगहीन पिवळट फिक्या पाचोळ्याला जागा करून द्यावीच लागते हो! संन्यस्त वृत्तीनं हीच पानं झाडावरून 'एकेक पान गळावया' लागून खाली झेपावतात. जीवनधर्म सांगतात.

...पावसाचे थेंब झेलून 'ओलेती' होणारी पानं, आकाशाकडे झेपावणाऱ्या पंखांना घरट्यांतून आसरा देणारी पानं, एखाद्या षोडशा कळीला फुलण्यासाठी आडोसा देणारी पानं, स्वत:तच गुंगून बेभानपणं गाणं म्हणणारी पानं, आकाशावर नक्षी कोरणारी पानं, आपल्या हिरव्या हातांनी सृष्टीला पालवणारी पानं, फळभारानं झाड ओथंबून आलं असताना त्याला पर्णभारानं तोल देणारी पानं, सगळ्या जगाचे जीवंत रूप असणारी पानं, पुस्तकातून रमणारी, काळीज जपणारी आत्ममग्न पानं, फुललेल्या फुलतारुण्याला मखर देऊन सुशोभित करणारी पानं, केवडा-दवणा-पाचू-तुळस-सब्जा बनून सुंगधीत होणारी, दरवळणारी पानं, पारावर खेळणाऱ्या पोरांना रिझवणारी पानं, सूरपारंब्या खेळणाऱ्या पोरांना स्वत:त लपवणारी पानं, माणसासकट गायीगुरांना चवीनं भरवणारी पानं, अन् स्वत:ला अंतिम क्षणी संपवत पिवळी पडणारी पानं! यावर किती बोलावं? लिहावं? लिहायचंच झालं तर पुस्तकाची पानेच्या पाने भरून भरभरून लिहिता येईल. तेव्हा पानांविषयी आता याक्षणी पानभर इतकंच.

## प्रतिक्रिया

सकाळी सुरेखाचा फोन आला की, 'ताई, 'प्रत्युष' या कार्यक्रमाबद्दलच्या तुमच्या प्रतिक्रिया मला लिहून पाठवा.'

कार्यक्रम होऊन एक महिना होत आला; तरी त्याच्या स्मृती अजूनही मनात रेंगाळत आहेत. म्हणूनच त्यातील ठळक गोष्टी नमूद कराव्याशा वाटतात.

सुरूवातीला गणेश वंदनेच्या पार्श्वभूमीवर बंसीने आपल्या डोक्यावरील पागडी दीपक कोठारेच्या डोक्यावर ठेवली.

जणू जुन्या पिढीने पुढील पिढीकडे कार्यक्रमाची सूत्रे सुपूर्द केली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे विश्लेषण करायचे झाल्यास एक प्रेक्षक म्हणून मी असे सांगेन की, 'प्रत्युष ०९' हा अतिशय शिस्तबद्ध रीतीने आखलेला एक सुंदर कार्यक्रम होता.

या कार्यक्रमात भाग घेतलेल्या सर्व कलाकारांनी आपले तन, मन ओतून कामे केली होती.

अगदी जान्हवी कीर्तिकरच्या ४ वर्षांच्या मुलापासून मोठ्यांपर्यंत सर्वांची मेहनत जाणवली.

त्याचप्रमाणे कलाकारांबरोबर ज्यांनी ह्या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले; त्यांच्या मेहनतीलासुद्धा तोड नव्हती;

झालेल्या प्रत्येक कार्यक्रमानंतर पुढच्या कार्यक्रमाबद्दलची उत्कंठा कौतुकमिश्रीत होती.

नेपथ्य, लाईटस्‌ची व्यवस्था व ध्वनीक्षेपणाची व्यवस्था चोख होती.

'फॅशन शो'च्या कार्यक्रमात साड्यांच्या विलोभनीय रंगांना शोभणाऱ्या सुंदर किनारी डोळ्यांना सुखद आनंद देऊन गेल्या.

फक्त एक गोष्ट खटकली ती म्हणजे निवेदिकेचे निवेदन.

आपली मराठी भाषा जेवढी सोपी, तेवढीच व्याकरणात कठीण आहे. त्यामुळे या अशा मोठ्या कार्यक्रमाच्या वेळी निवेदिकेने आभार, अभिनंदन या शब्दांचा प्रयोग योग्य वेळी योग्य ठिकाणीच करावयास हवा होता.

आणखी एक की, पाठारे प्रभु ज्ञातीत अनेक मुली सुंदर गातात. त्यांच्यापैकी कुणाची एक, दोन गाणी ठेवली असती तर मिमिक्रीच्या कार्यक्रमांपेक्षा ती अधिक श्रवणीय झाली असती.

असो. पण एकंदरीत कार्यक्रम दृष्ट लागण्याजोगा होता.

पुढे जाऊन मी तर असे म्हणेन की, 'अशोक हांडेच्या 'मराठी बाणा'ची ही छोटी आवृत्तीच होती.

**-सुरुचि अनिल प्रधान**

कै. रामराव गणपतराव विजयकर यांच्या निधनास ३१ जुलै रोजी पन्नास वर्षे झाली. ज्ञाती आणि ज्ञातीबाहेरील त्यांच्या कार्याची विशेष नोंद इतिहासाने केली आहे. त्यांच्या स्मृतीस नम्र वंदन.

### Invitation

Shri MATAJI KANKESHWARI Temple Trust (Kankai) is arranging 48th SHARDIY NAVRATRI UTSAV at Rajpuria Bagh, Navinbhai Thakar Road , Vile Parle( E). Mumbai 400 057 from 19.09.2009 to 26.09.2009

Shri Kankai devotees may participate in daily PUJA and AARATI at 08.30 a.m. and 08.30 p.m. and Mahaprasad after evening AARATI A. HAVAN will be on 26.09.2009.

Pathare Prabhu devotees may contact for further details -
Mr Tushar Kirtikar :
(Mob : 9819423193)
(Mr Umesh Kirtikar :)
(Mob : 9869228489)

# पेशवेकालीन परंपरा-रहाडीमध्ये रंगपंचमी

**-उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर**

जानेवारी महिन्यात नवीन इंग्रजी वर्ष सुरू होते. तेव्हा हिंदूंचे वर्ष सरत आलेले असते. लवकरच म्हणजे मार्च महिन्यात फाल्गुन महिना येतो. तो संपला की चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजे गुढीपाडव्याला नवीन हिंदू वर्षाच्या पताका झळकतात. पण त्यापूर्वी, म्हणजे फाल्गुन पौर्णिमेला होळी पेटविण्याचा रिवाज आहे. थंडी संपली आहे आणि आता उन्हाळा सुरू होणार आहे याचा तो सर्वांना 'सिग्नल' असतो.

होळी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी त्याच होळीच्या राखेने धुळवड खेळली जाते आणि नंतर चार दिवसांनी येणाऱ्या पंचमीला रंगपंचमी म्हणतात. तेव्हा लहानथोर सारी माणसे एकमेकांच्या अंगावर पाण्यात कालवलेले रंग उडवून सण साजरा करतात. मुंबईत आपण पहातो की छोटी मुले प्लॅस्टिकच्या पिचकाऱ्यांतून, मोठी माणसे चक्क बादल्यांमधून हे रंग उडवीत असतात आणि उपद्रवी कारटी कुणाच्याही अंगावर पाणी किंवा रंग भरलेले फुगे फेकून मारत असतात.

मात्र इथे नाशिकमध्ये या साऱ्या मस्करी-कुस्करीच्या जोडीला, पेशव्यांच्या काळापासून आजपर्यंत इमानदारीत पाळला जाणारा आणखी एक रिवाज आहे. तो म्हणजे रंग-पंचमीच्या दिवशी रहाडीत रंग खेळणे.

आता रहाड कशाला म्हणतात? तर चौकात किंवा तिठ्यावर चक्क रस्ता खणून बांधून काढलेला हौद. हा हौद चांगला पंधरावीस फूट लांब, तेवढाच रूंद आणि सात-आठ फूट, क्वचित बारा फुटापर्यंत खोल असतो. त्याला दोन-दोन फुटांच्या चारी बाजूंनी पायऱ्या असतात; म्हणजे उतरून जाता येते. हा पक्का बांधलेला असतो आणि वर्षभर माती भरून बुजवून ठेवलेला असतो. होळी झाल्यावर दोन दिवसांनी तो उकरायला सुरुवात होते. भरलेली माती पूर्ण उपसून झाली की मग सगळा हौद पाण्याने स्वच्छ धुवून काढून ते पाणीसुद्धा उपसून टाकतात. नंतर पंचमीच्या आदल्या दिवशी तो सारा हौद स्वच्छ पाण्याने काठोकाठ भरला जातो. असे म्हणतात की पूर्वी त्या परिसरामधल्या सर्व स्त्रिया नदीवर जाऊन घागरी भरून आणत आणि हौद भरत असत. आता मात्र पाण्याचे टँकर्स बोलावून हौद भरतात.

पंचमीच्या दिवशी सकाळी हौदासाठी पेटत्या ठेवलेल्या होळीवर मोठया कढईमध्ये वनस्पतीचा किंवा फुलांचा रंग उकळवला जातो आणि तो या भरलेल्या हौदामध्ये ओतून ढवळला जातो; म्हणजे अबोली, लाल, गुलाबी किंवा जांभळा असा दाट रंग तयार होतो.

पंचवटी विभागामध्ये नागचौकी नावाच्या ठिकाणी जी रहाड आहे ती सर्वात मोठी आहे. हौद भरून रंग तयार झाल्यावर दुपारी या रहाडीची पद्धतशीर पूजा करून पुजारी तिला प्रदक्षिणा घालतात. रंगामध्ये पहिली उडी मारण्याचा मान त्यांचाच असतो. नंतर सूर्यास्तापर्यंत तेथे साऱ्यांचा हौदात उड्या मारण्याचा आणि रंग उडवण्याचा कार्यक्रम असतो. असे सांगतात की पूर्वीच्या काळी तेथून जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला पकडून रहाडीत बुचकळून काढले जायचे. तयार केलेला रंग औषधी असल्यामुळे रंगात बुचकळून निघणे आरोग्यदायी मानले जाते.

रहाडीमध्ये रंग खेळण्याची पद्धत पेशव्यांनी पुण्यामध्ये सुरू केली असे सांगितले जाते. मातोश्री गोपिकाबाई पेशवे यांच्या पुढाकाराने १७५० नंतर नाशिकमध्ये मंदिरे बांधली गेली. राघोबादादांचा वाडा बांधला. सरदारांचे वाडे बांधले आणि राज्यकारभारात नाशिकचे महत्त्व वाढले. त्या काळात रहाडीची प्रथासुद्धा नाशिकला आली. शहरात पाच ठिकाणी रहाडी होत्या. आता त्यापैकी नागचौकातली, दिल्ली दरवाज्यावरची आणि तिवंध्यावरची अशा तीनच रहाडी वापरात आहेत. रहाडीमध्ये उड्या मारताना किंवा इतरांना बुचकाळून काढताना शेकडो वर्षात एकदाही अपघात झालेला नाही हे विशेष आहे.

एक मजेदार शंका येते की म्हणजे, स्मगलर्स किंवा गुंडाच्या टोळ्या आणि पोलीस यांच्यामध्ये ज्या मारामाऱ्या होतात त्याला आपण 'राडा झाला' म्हणतो. तो शब्द या रहाडीवरूनच आला की काय?

सुमने- **कडू आणि गोड** बालविभाग

-डॉ. सुमन नवलकर

आठ दिवसांच्या आजारपणाने आशय अगदी कंटाळून गेला होता. आधीच तापामुळे तोंड कडू झालं होतं. त्यातच आणखी कडू औषधं. कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या, पेज-खिचडी असलं पथ्याचं जेवण आणि सारखं आपलं पांघरूण घेऊन झोपून राहायचं. मधेच घाम येऊन ताप उतरला, की अंग चिकट. तरीपण आंघोळ नाही ती नाहीच. अंग गरम पाण्यात टॉवेल बुडवून त्याने पुसायचं नुसतं. शिवाय अंगणात जाणं तर बंदच.

नाही म्हणायला, टी. व्ही. कितीही वेळ पाहिला तरी ओरडत नव्हतं कोणी. शिवाय कोणी 'अभ्यास कर' म्हणत नव्हतं, की कोणी जरासुद्धा ओरडत नव्हतं. एरव्ही जरा जास्त वेळ टी. व्ही. पाहायला लागलं की आई ओरडायची, ''कसला सारखा टी. व्ही. पाहतोस आशू? अभ्यास नाही का?'' पण आता आशयला वाटायला लागलं होतं की अभ्यास परवडला, पण हे झोपून राहणं नको. संध्याकाळ झाली की अंगणातून मुलांचे आवाज यायचे; आरडा-ओरडा, धम्माल, मग मऊ-मऊ कापसाची गादीपण आशयला काट्यासारखी टोचायला लागायची. वाटायचं, 'हा आराम नको आणि हे टी. व्ही. पाहणं पण नको. अभ्यास परवडला, पण हे घरात बसणं नको. संध्याकाळीसुद्धा खेळायला जायचं नाही, म्हणजे काय?'

संध्याकाळी खेळून घरी जाता-जाता परवा साहिल आणि राज त्याला पाहायला आले होते. दोघे कसे खेळून-खेळून मस्त दमलेले होते. गालांवरून गळणारा घाम शर्टाच्या हातांना पुसत होते. कपडे मातीत छानपैकी मळलेले होते. साहिलच्या काखेत बॅट आणि राजच्या हातात बॉल. 'हा खेळून आलेला घाम कुठे आणि मला गोळ्या खाऊन येणारा घाम कुठे?' आशयचं मन खंतावलं. पाच-दहा मिनिटंच होते दोघे. तेवढ्यात आईने त्यांना थंडगार लिंबू-सरबतही दिलं.

'काय मजा आहे. मस्त माझ्यासमोर लिंबू-सरबत पितायत. आणि मी पितोय कडू औषध.' आशय पांघरुणाच्या आत चुळबुळला. लांबूनच दोघांनी आशयची चौकशी केली. बहुतेक दोघांच्याही घरून त्यांना सांगितलेलं असणार, ''जास्त जवळ जाऊ नका रे त्याच्या. नाहीतर घेऊन याल ताप पाहुणा म्हणून.''

खरं तर त्या दिवशीच आशयचा ताप उतरला होता. पण अशक्तपणा इतका आला होता, की साधं उठून बसलं, तरी गोल-गोल फिरत होतं सगळं. पण आता या नंतरच्या दोन दिवसात मात्र जरा-जरा ताकद आल्यासारखी वाटत होती. मोसंबीच्या रसामुळे असणार. थंड नाही तर नाही, पण मोसंबीचा रस, गरम-गरम सूप असं छान-छान काय-काय पिऊन स्वारी दोन दिवस जरा खुशच होती.

तेवढ्यात आत्या आली आशयला पाहायला. आत्या म्हणजे मस्तच. येताना आशयच्या आवडीची चॉकलेटं, क्रीमवाली बिस्किटं आणि पॉपिन्स घेऊनच आली होती. बरोबर आरोहीलाही आणलं होतं.

आईच म्हणाली, ''तिला कशाला आणलंस सुजाता? लहान आहे ना ती पण? ताप संसर्गजन्य असतो ना?'' पण आत्या म्हणाली, ''काही होणार नाही वहिनी. भित्यापाठी ब्रह्मराक्षस म्हणतात ना? आपण काळजीच करायची नाही.''

मग आरोहीबरोबर मस्त साप-शिडीचे चार डाव खेळला आशय. मजा आली. शिवाय आरोही तिच्या शाळेतल्या गमती-जमतीही सांगत होती. एरव्ही 'मुलींच्या त्या कसल्या गमती-जमती?' असं आशयचं मत असतं. पण तापाने झोपून कंटाळलेल्या आशयला आरोहीच्या गोष्टी ऐकायलाही मजा आली. 'मुलीपण करतात हं का मजा,' असं पहिल्यांदाच मनात आलं त्याच्या. आईने दिलेलं लिंबू-सरबत त्याच्या पुढ्यात बसून प्यायली आरोही, तरी तिचा राग नाही आला त्याला आणि तिला सरबत देणाऱ्या आईचाही राग आला नाही, हे विशेष.

आशयला आत्या तशी आवडतेच. लाड खूप करते ना? शिवाय पाठीवरून हात फिरवला आणि हळूच टपलीत पण मारलं तिने, तेव्हा तर खूपच बरं वाटलं त्याला. डोळे पण जरा ओलावल्यासारखे वाटले.

आरोही आणि आत्या निघाले तेव्हा आशय त्यांना टाटा करायला म्हणून दरवाजापर्यंत आला, तरी आज चक्कर-बिक्कर आली नाही त्याला. मोसंबीचा रस जिंदाबाद. ''उद्या पण ये ना आत्या आरोहीला घेऊन'' आशय म्हणाला. आत्या हसली. मान पण डोलावली तिने. पण आशयला माहितीय, 'ती कसली येते! लांब राहते ना ती! शिवाय नोकरीपण करते. उद्यापासून आईपण जाईल ऑफिसला. तिने रजा घेतली होती, आशयला बरं नाही म्हणून. पण आता उद्यापासून तर आशयही जाईल शाळेला. मज्जा. सगळे मित्र भेटतील-मज्जा. मधल्या सुट्टीत खेळू-मज्जा. जाता येता शाळेच्या बसमध्ये पण मस्ती करू-मज्जा. डब्यात खायला क्रीम बिस्किटं नेऊ-मज्जा. शाळेत अभ्यास करू-मज्जा. आँ? डोक्यावर परिणाम झाला असणार आपल्या. चक्क गणितं पण सोडवावीशी वाटताहेत म्हणजे. औषध द्यायची वेळ झाली म्हणून आई पलंगापाशी आली. ''औषध घे आशू बाळा.'' आजारपणाचं हे एक बरं असतं. अगदी हाक मारण्यापासून लाडांना सुरूवात.

''आई, तापाने माझ्या डोक्यावर परिणाम झाला असेल का गं?'' आशूच्या प्रश्नावर घाबरलीच आई. कपाळाला लगेच हात लावून पाहिला तिने. ''काय घाबरवतोस रे!''

तेवढ्यात बाबाही आले. ''बरं वाटत नाहीये का आशय पुन्हा?'' बाबांच्या आवाजात पण काळजी!

''नाही हो, अभ्यास करावासा वाटतोय. गणितं पण सोडवावीशी वाटतायत सरळ-सरळ. म्हणून भीती वाटली, की डोक्यात ताप-बिप तर नसेल ना गेला, आजी म्हणत होती तसा!''

''चल गाढवा, वाटेल ते बडबडतोस,'' आजी तेवढ्यात आलीच. तिचं 'गाढवा' ऐकून आशयची खात्री झाली की खडखडीत बरे झालो आहोत आपण. नाहीतर गेले आठ दिवस सारखं आपलं राजा, सोन्या, बाळा असलंच काय-काय चाललं होतं तिचं.

टुणकन् उडी मारून आशय पलंगावरून उतरला. ''आज मी टेबलापाशीच बसून जेवणार हं का आजी. आणि लोणच्याची फोड पण हवी मला आज.'' आशयने लगेच मागणी केली.

''लगेच लोणचं नको हं का बाळा.'' आजी पुन्हा 'बाळा'वर आली. ''लोणचं उद्या खा.'' लोणचं नाही, पण मुरांबा मात्र वाढला आजीने. आज मुरांबा जरा जास्तच गोड लागला. जरा जास्तच गोड.

❏

**पाठारे प्रभु महिला समाज**

पाठारे प्रभु महिला समाजातर्फे शनिवार दि.३० मे २००९ रोजी स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांचा निकाल पुढील प्रमाणे-

**काव्य स्पर्धा-**

विषय-'बारशाचा पाळणा'

(काव्य घरून लिहून आणणे)

प्र.क्र.- श्रीमती सुरूपा राणे (देवरूखकर)

द्वि. क्र.-सौ. मीना रमेश जयकर

तृ. क्र.-सौ. स्नेहा नंदकिशोर कोठारे

**निबंध स्पर्धा-**

मुलींसाठी (१५ वर्षाखालील)

विषय-माझी ईश्वराबद्दलची कल्पना (मराठी)

My ideas about God (English)

(निबंध घरून लिहून आणणे)

प्र. क्र.-कु. अपूर्वा नितीन कोठारे

द्वि. क्र.-कु. वैजयंती अजिक्य

तृ. क्र.-कु. निकिता महेश जयकर

**निबंध स्पर्धा**-महिलांसाठी

विषय-योगायोग


प्र. क्र.-श्रीमती. सुनिता विठ्ठल कोठारे

द्वि. क्र.-श्रीमती. हेमा जयकर

तृ.क्र.-श्रीमती. शीला शंकर विजयकर

वरील स्पर्धांचे परीक्षण अनुक्रमे श्रीमती नलिनी तळपदे व सौ. उज्ज्वला ब्रम्हांडकर या भगिनींनी केले.

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# YUVA MANCH

Together Towards Tomorrow

## श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज मठ, गुहागर, रत्नागिरी

-अभिजित सुरेश विजयकर

महाराष्ट्रात अक्कलकोट स्वामींच्या आशीर्वादाने बऱ्याच स्वामीभक्तांना प्रचिती येऊन त्यांनी स्वामीभक्तांसाठी मठांची स्थापना केलेली आहे. स्वामींचे एक शिष्य- श्री आनंदनाथ महाराज हे कुडाळदेशकर होते. ते वालावलचे राहणारे असल्यामुळे त्यांचे आडनाव वालावलकर असे होते. श्री स्वामी समर्थ महाराजांची किर्ती ऐकून ते अक्कलकोटास गेले. स्वामीसमर्थ महाराजांचा अनुग्रह झाल्यानंतर अक्कलकोटास ते बरीच वर्षे राहिले. आपण स्वतः तयार केलेली पदे वगैरे म्हणून महाराजांपुढे एकतानतेने ते भजन करीत असत. जेव्हा श्री स्वामीसमर्थांनी आनंदनाथ महाराजांस जाण्याची आज्ञा दिली तेव्हा त्यांनी स्वामीसमर्थांजवळ प्रसाद मागितला. स्वामीसमर्थांनी प्रसन्न होऊन लहान पादुका स्वतःच्या हस्ते काढून दिल्या. आनंदनाथ महाराजानी जे साहित्य निर्माण केले त्यातील अभंग, पदे वगैरे दादरच्या मठात नेहमी म्हटली जातात. श्री आनंदनाथ महाराजांनी तीन मठ स्थापन केले आहेत. त्यातील वेंगुर्ल्याच्या मठामध्ये स्वामीसमर्थांनी दिलेल्या आत्मपादुकांची स्थापना केलेली आहे. श्री आनंदनाथ महाराजांनी सन १९०३ रोजी वेंगुर्ल्याच्या मठाशेजारी जीवंत समाधी घेतली.

आमचे एक स्नेही व स्वामीभक्त श्री. महेश जोशी ऊर्फ जोशीकाका, मालाड (पूर्व), मुंबई, हे मुंबईत हर्बल प्रॉडक्टसचा व्यवसाय करीत होते. स्वामीसमर्थांनी जोशीकाकांना हा व्यवसाय बंद करून मुंबई सोडून रत्नागिरीत स्थायिक होण्याची आज्ञा केली. स्वामींची आज्ञा येताच जोशीकाकांनी गुहागरमध्ये एक जागा विकत घेऊन, त्या जागेत श्री स्वामी समर्थ मठाची स्थापना केली व मठाच्या बाजूला स्वतःसाठी एक घर बांधले. अश्विन महिन्यात २३ ऑक्टोबर २००८ ला वास्तू शांती, कलशारोहण, स्वामींची तसबीर, गणपती, स्वामींची मूर्ती, शिवलिंग, अन्नपूर्णा, विष्णु महाराज व सूर्य नारायण ह्यांची प्राणप्रतिष्ठा व स्वामींच्या पादुकांची स्थापना करण्यात आली. ह्या सोहळ्यासाठी रत्नागिरी व मुंबईतून बऱ्याच मान्यवर लोकांना व स्वामी भक्तांना निमंत्रित करण्यात आले होते. पण काही कारणास्तव मला व माझ्या पत्नीला जाणे जमले नाही. श्री अक्कलकोट स्वामी समर्थमहाराज मठ, दादरचे मुख्य विश्वस्त, श्री. गजेंद्र चंद्रसेन गोरक्षकर, त्यांच्या दोन कन्या, नातू व आमचे चुलते श्री. अरूण आनंदराव विजयकर ह्या सर्व भक्त मंडळींनी ह्या सोहळ्याचा लाभ घेतला. ह्या सोहळ्यानंतरही जोशीकाकांचे व माझे फोन चालूच असायचे, पण गुहागरला जाण्याचा योग काही येत नव्हता.

अखेर २२ फेब्रुवारी २००९ ला गुहागरला जाण्याचा योग आला. २७ सीटर बस करून जाण्याचे ठरले. सकाळी साडेपाच वाजता गोरक्षकरांची कन्या सौ. पूजा (शुभांगी) सुरेंद्र केसवानी, दहिसर (पूर्व), ह्यांच्या निवास्थानाहून निघालेली बस, बोरीवली, मालाड, अंधेरीवरून सात वाजून वीस मिनिटांनी वाशीला (नवी मुंबई) माझ्या घराच्या खाली येऊन थांबली. आम्हा दोघाना वाशी हायवेला जाता आले असते. पण माझ्या घरी यायला दोन कारणं होती. पहिले म्हणजे विकत घेतलेली नवीन वीणा माझ्याकडेच होती व बसची वाट पाहत ती वाशी हायवेला बाकड्यावर ठेवणे मनाला पटत नव्हते व दुसरे कारण म्हणजे सुलभ शौचालय. सकाळी साडेचारपासून ते सातवीसपर्यंत म्हणजे तब्बल तीन तास उलटून गेल्यावर बऱ्याच मंडळींना त्याची गरज होती. माझ्या बॅग्स व वीणा खाली आणेपर्यंत काही मंडळीनी घरी येऊन स्वामींच्या पादुकांचे दर्शनही घेतले. अखेर सात पन्नासला सर्वांनी स्वामी समर्थांचा जयजयकार करत वाशी सोडले.

२२ तारखेला दहिसर-वाशी-गणपतीपुळे व संध्याकाळपर्यंत गुहागर असा कार्यक्रम आखण्यात आला होता. पण नागोठणेपासून अर्धातास अगोदर बसचे मागचे दोन्ही टायर पंक्चर झाले व ड्रायव्हरचे ड्रायव्हिंग स्लो असल्यामुळे, कामत रिसॉर्ट नागोठणेला थोडी पोटपूजा करून, बस गॅरेजमधून येऊन, गणपतीपुळेला पोचायला रात्रीचे साडेआठ वाजले. 'स्लो' ड्रायव्हिंगमुळे सर्वजण थोडे निराश झाले होते. पण हाच ड्रायव्हर जर रॅश असता तर सर्वांची झोपच उडाली असती. खरंतर गाण्याच्या भेंड्या खेळत व सर्व आपलेच स्वामीभक्त असल्यामुळे टाईम कसा गेला हे कळलेच नाही. संध्याकाळी चार वाजल्यापासून जोशीकाका आमची आतुरतेने वाट पाहात होते. जोशीकाकांनी व इतर स्वामी भक्तांनी जेवणाची व राहाण्याची चोख व्यवस्था केली होती. गणपतीपुळेला श्री गजाननाचे दर्शन घेऊन रात्री एक वाजता बस गुहागरला पोहचली. रात्रीचे जेवण आटोपून गोरक्षकरांना जोशी काकांच्या घरात, तर इतर सर्वांना पाच मिनिटांच्या अंतरावर त्यांच्या स्नेह्यांच्या घरात अशी सर्वांची राहण्याची सोय करण्यात आली होती. दिवस भराच्या थकव्यामुळे रात्रीचे जेवण आटोपून अंथरूणावर कधी झोप लागली ते कळलेच नाही. पुरूषांना तळ मजल्यावर तर महिलांना पहिल्या मजल्यावर झोपण्याची व्यवस्था केली होती. २३ तारखेला महाशिवरात्री होती. सकाळी सहा वाजता जाग आली व मुंबईच्या गर्दीपासून लांब, गुहागरसारख्या शांत ठिकाणी फ्रेश वाटत होते. आदल्या रात्री उशीरा पोहोचल्यामुळे भजनाचा कार्यक्रम रद्द करावा लागला. सकाळचा चहा, स्नान, संध्या आटोपून बाहेर येताच

(पान ५, कॉलम १ वर)

## Friendship

You're that sunshine,
That greets every dawn.
That ray of hope,
So troubles are all gone.

You simply manage somehow,
To always make me smile.
You're the other half of friendship,
But I feel guilty for a while.

You have no idea,
How much you mean to me.
Friendship was a game,
But you've helped me to stop and see...

That bad experiences are cliche,
But true friends are not.
Now I know, never to let go,
And I'll really miss you a lot.

Achieving my ambitions,
Is no longer all I need.
Because it may just take a true friend,
To make a friend succeed.

Many times I wander,
What is it that you're thinking?
You're so lucky you don't stress,
I hope there's nothing you're hiding.

Because if ever there is,
Don't forget that I'm here.
I may be loud and annoying,
But trust me, I really do care.

Believe me when I say,
I'm always right by your side.
When you're feeling lost,
Then I'll even try and be the guide.

Because I'd do anything and everything,
Just to see you smile.
You're special in your own way,
And our friendship is worthwhile.

Thank you for sticking by me,
When I went through thick and thin.
You've changed my life around...
And I mean it from within

**- Swapneel Desai**

# God – Please let there be more like us!

**-Harsha Arun Dharadhar**

'Gujar ganda', 'Ghaati Marathi','Silly Sardarji',' Chiku Marwadi' Brilliant adjectives given to the entire populace of the respective segments. We are all Manu's kids – aren't we? No two fingers of a single hand are the same. So when some one tarnishes a reputation and stereotypes based on just one factor - the language spoken at home- shouldn't the logic behind be contested?

I was born to a Pathare Prabhu mother from Aamchi oops Aapli Mumbai and a Gujarati Brahmin father from Kutch. I was raised in the City of joy – Kolkatta(West Bengal). Studied at Aarya Vidya Mandir and Gokhale Memorial, amongst a huge mix of friends belonging to Marwadi and Punjabi backgrounds. At a very tender age, my mum had instilled in me a sense of soaking in the good from whatever anyone has to offer. So 'Pathare Prabhu' signified literacy, sophistication and classy English. 'Gujarati' was for their acute business acumen and vegetarian food. 'Bengal' was and is dear to me not just for its sweets but also for their musical lingo, art and academic intellect that oozes out from almost every house there. When I came to Mumbai as a young bride and settled into the role of a typical Parbhin, I was aghast when I overheard the explicit terminology mentioned in the first line of this narrative.

Marwaris of Kolkatta are the richest of the lot and known for their sophisticated dressing sense and acts of charity for e.g. Birla (the name says it all). Also in my maayka, I was used to choosing taxis after ensuring that the driver was a Praaji (Sardar). That was for safety, goodness of the heart and a thorough knowledge of roads and driving. Gyaani Jail Singh a Sardar was awarded the title 'Gyaani' so I failed to understand why people ridiculed the rest of his clan.

I have been going back in history, now lets talk of current times. My daughter who until she was a Miss considered herself 75% Sokaji and 25%Gujarati, thanks to her lineage ,continued the family tradition and married for love. Mulga aahe 'Aadu' jaati cha! A Marathi Deshasta Brahman from Gwalior Madhya Pradesh. Yeah - I heard one of you saying "Mera Bharat Mahan". Brahmans have been stereotyped as 'chikat' (misers) but my son in law defies that law.

Having crossed 50 and going on 60 in a few years time, I have earned the privilege to dish out a sermon to our Generation Next. You guys are lucky to know so much at such a young age thanks to media like cinema, television and the ultimate resource that's the World Wide Web. So please do not be 'Koop Manduk' (translated as frog in a small well who thinks that the well is all there is to know). Broaden your perspective of the world. Reach out for the horizon. Cross the borders and soak in varied cultures. Appreciate and assimilate the best from each one. Read a lot and listen to what others have to say. Whenever a few jealous people try to pin you down, remember they are like crabs trying to not let you rise up since they cannot. Give them the Royal Ignore ;o)

The title of my narrative might have sounded narcissist or arrogant to a few. But I truly believe that a good marriage of different cultures harbors broader mindsets. I hate it when somebody says "I hate so and so community". Just because someone from a particular lot has done a wrong deed, the whole clan is ridiculed.

For me, Marathi gentry on a trip to Kashmir or a Bengali rickshawala on the streets of Thane have become friends. I feel close to Pathare Prabhus, Gujaratis, Punjabis, Marwadis, Bengalis and now locals from MP for their love bestowed on me. The Bihari rickshaw pullers of my mohalla in Kolkatta, still welcome me with a lot of warmth and they have become a part of me. **I call it the Pyaar do Pyaar lo effect,** a principle I tried to instill in a few thousand young minds, my students who keep coming for my love and guidance.

Synthesis of Hindu Muslim efforts has gone into the making of something as beautiful as the Taj. Do I need to say any more!

No I am not contesting for elections from your constituency. Keep smiling..

Love to all and God be with you

---

(पान ४, कॉलम ४ वरून)

जोशीकाकांच्या बंगल्यातून आमच्या खंडाकाकांचा (उर्फ श्री. गजेंद्र गोरक्षकर) निरोप आला की अर्ध्या तासात भजन सुरू करायचे आहे. जोशीकाकांचे मात्र सकाळी उठल्यापासून ते दुपारी बारापर्यंत मौनव्रत असते. भजनाची कल्पना अगोदरच असल्यामुळे मुंबईहून चिपळ्या आपल्यासोबत घेऊन गेलो होतो. ह्या चिपळ्या आम्ही विकत घेतलेल्या नाहीत. आमचे आजोबा कै.जयवंत बाळकृष्ण विजयकर व पणजोबा कै.बाळकृष्ण माधवराव विजयकर ह्यांना कारागिरीचा छंद होता. ह्या चिपळ्या आमच्या पणजोबांनी स्वत: बनवलेल्या आहेत असे आमचे आजोबा व वडील कै.डॉ. सुरेश जयवंत विजयकर सांगायचे.

गुहागरला गोरक्षकरांच्या दोन कन्या सौ. पूजा (शुभांगी) सुरेंद्र केसवानी व सौ. प्रांजली (हेमांगी) राजेश धुरंधर ह्यांनी स्वामी चरणी हुक्का अर्पण केला. भजन सुरू होण्यापूर्वी श्री. गोरक्षकरांनी शिवलिंगाची पूजा करून त्यावर बेलाची पानं वाहिली, स्वामींना हार व शेला घातला. नंतर सर्व स्वामी भक्तांनी बेलाची पानं वाहून स्वामी चरणी एकतारी वीणा अर्पण केली. हीच वीणा घेऊन गोरक्षकरांनी भजनाला सुरूवात केली. वीणा आणि चिपळ्यांच्या तालावर भजन सुरू झाले आणि मठात प्रसन्न वातावरण निर्माण झाले. स्वामी भक्तांची गर्दी वाढू लागली आणि सर्वजण भजनात दंग झाले. भजन चालू असताना वेळ कसा गेला हे कळलेच नाही. साडेदहा वाजता बंगल्यातून नाश्ता करण्यासाठी बोलवणे आले. दुपारी बारानंतर आरती व आरतीनंतर जोशीकाका आपले मौनव्रत सोडतात. शेवटी अकरा वाजता भजनाची समाप्ती झाली. बारानंतर स्वामींचा जयजय-कार, हुक्का, नैवेद्य, आरती, प्रदक्षिणा व पुन्हा जयजयकार असा रोजचा कार्यक्रम असतो. सर्वांनी दर्शन घेतल्यावर गाभाऱ्याचे दरवाजे बंद करतात. दुपारी दोन वाजता सर्वांचे भोजन आटोपून पुन्हा मुंबईला जाण्याची तयारी करायची होती.

अखेर सायंकाळी पाच वाजता गुहागरला सर्वांचा निरोप घेऊन बसने मुंबईच्या दिशेने प्रस्थान केले. मुंबईला जाताना दोन तास वाचवण्यासाठी जोशीकाकांनी दुसऱ्या मार्गाने जाण्याचे सुचवले होते. हा मार्ग म्हणजे बोटीतून प्रवास करण्याचा होता. गोव्याप्रमाणेच अख्खी बस बोटीतून म्हणजेच खाडीतून एका बाजूनी (धोपावे व दाभोळ) दुसऱ्या बाजूला असा प्रवास होता. बोट यायला अवकाश असल्यामुळे धोपावे धक्क्यावर ग्रुप फोटोही काढण्यात आले. बस बोटीत शिरताच सर्व प्रवासी बोटीच्या अपर डेकवर गेले. वरती डेकवर आईस्क्रीम, कोल्डड्रिंक व कोकणातले अन्य पदार्थही विक्रीला होते. आमच्यातील एक मनमिळावू, दानशूर व हौशी स्वामीभक्त सौ. उज्ज्वला (नयना) नरेश किर्तीकर ह्यांचा २३ फेब्रुवारीला वाढदिवस असल्यामुळे सर्व स्वामीभक्तांना आईस्क्रीमची ट्रीट व महिलांना डेक वरील आंबा किंवा आवळ्याच्या मुरंब्याची बाटली देण्यात आली.

खाडी पार करून बस पुन्हा मुंबईच्या दिशेने धावू लागली. संध्याकाळचे साडेसात वाजले होते. बाहेर अंधार पडलेला होता. ''श्री गुरू स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ'' हे भजन बसमध्ये सुरू झाले. थोड्या वेळानी पुन्हा सर्व शांत झालं होतं. सर्वांना आदल्या दिवसाचा थकवा जाणवत होता. हा डोंगरा-तला रस्ता असल्यामुळे, रस्त्याला एकही हॉटेल किंवा ढाबा नव्हता. साडेअकरा वाजता बस एका चहाच्या टपरीवर येऊन थांबली. चहा व कॉफी शिवाय कोठेही एवढ्या रात्री खाण्यापिण्याची व्यवस्था होऊ शकत नव्हती. पुन्हा बसने प्रस्थान केले व अडीच वाजता, वाशीला येऊन थांबली. इतर सर्वांना बोरीवलीला पोचायला सकाळचे साडेचार वाजले व अशी आमची गुहागरची यात्रा शांतपणे पार पडली! असो!

कधी रत्नागिरी, चिपळूण, गणपतीपुळे व कोकणातील इतर तीर्थक्षेत्राला जाण्याचा योग आला तर श्री. स्वामी समर्थ मठाला आवर्जून भेट द्या. जोशीकाका व त्यांच्या पत्नी ''श्री स्वामी समर्थ महाराज की जय'' ह्या जयघोषात आपले हसतमुखाने स्वागत करतील. विशेष म्हणजे हा मठ जोशीकाकांनी स्वखर्चाने उभा केलेला आहे. कोणाकडूनही देणगी घेतलेली नाही किंवा स्वामींच्या समोर दानपेटीही ठेवलेली नाही. अशा जागृत स्थानाला आपण भेट देऊन स्वामींचे दर्शन घ्यावे ही श्री अक्कलकोट स्वामी चरणी प्रार्थना.

।।श्री स्वामी समर्थ ।।

## पाठारे प्रभु सोशल समाज

दरवर्षीप्रमाणे आषाढी एकादशी निमित्त अभंगयात्रेचा भावपूर्व कार्यक्रम शनि. दि. ४ जुलै,०९ रोजी ठाकुरद्वारच्या व्यंकटेश मंदीरात प्रभु ज्ञातीय बंधुभगिनी व नेहमी येणारे भक्तजन यांच्या उपस्थितीत उत्साहाने साजरा झाला. कै. श्री. रसिक व्यवहारकर व कै. श्री. प्रवीण राणे ह्यांनी चालविलेल्या ह्या अभंगयात्रेचे हे २७ वे वर्षे होते.

सोशल समाजाच्या अध्यक्षा सौ. प्रमिला मधुकर तळपदे यांनी उपस्थितांचे स्वागत करून ही अभंग-यात्रा २६ वर्षे अखंड चालू ठेवणारे कै. श्री. प्रवीण राणे यांना २ मिनीटे स्तब्धता पाळून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. श्रीमती स्वाती राणे यांनी आतापर्यंत केलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

एकूण २५ लहानथोर कलाकारांनी विठूमाऊलीच्या चरणी आपली गानसेवा रुजू केली. यावर्षीही पाठारे प्रभु महिला समाजाच्या कार्यकारी मंडळाने सुश्राव्य भक्तीगीतांचा कार्यक्रम सादर केला. या सर्व कार्यक्रमावर आपल्या बुलंद आवाजाने व भक्तिरसपूर्ण आर्त स्वराने गणेशवंदना, गोंधळ, अंबाबाईचा जोगवा आणि साई भजन सादर करून श्री. केदार गोरक्षकरांनी कळस चढविला. संवादिनीपर श्री. प्रदीप राणे व श्री. वसंत मोरे यांनी साथ केली. तर तबल्यावर श्री. प्रदीप राणे व श्री.विजय हजारे यांनी ठेका धरला. साईड ऱ्हिदम गजानन मांद्रेकर यांचा होता. ध्वनी संयोजन श्री.सचिन भोसले यांचे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. नीता

(पान ६, कॉलम ३ वर)

## प्रभुतरुणास देणग्या

❀ वात्सल्यमूर्ती आई श्रीमती केशरबाई मोतीराम विजयकर, मातृतुल्य काकी श्रीमती अनुबाई बाबुराव विजयकर यांच्या स्वर्गवासास २५ वर्षे झाली. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ सौ. अंजली नाईकसाटम यांजकडून रु. २००२/- (रु.१००१/-प्रत्येकी)

❀ दि. १५-६-०९ रोजी ऐंशीव्या वर्षात पदार्पण केल्याप्रीत्यर्थ श्री. विनोद वामनराव कोठारे यांजकडून रु.१०००/-

❀ सौ. वृंदा शाम जयकर यांजकडून त्यांच्या सत्तराव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु.२७०/-

❀ श्री. नंदकुमार कृ. विजयकर याजकडून त्यांच्या सत्तराव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. २५१/-

❀ श्री. एम. जी. जयकरकडून रु. २५१/-

❀ सौ. निशा आणि श्री शरद शामराव कोठारेंकडून त्यांना नातू झाल्याबद्दल रु. २५०/-

❀ अंजली मिलींद धराधर यांजकडून त्यांची कन्या सायली हीस एस.एस.सी.ला ९१.८४ टक्के गुण प्राप्त झाल्याबद्दल रु. २५०/-

❀ श्री. मदनमोहन शा. नवलकर यांजकडून त्यांच्या लग्नाच्या ५० व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. १५१/-

❀ श्रीमती लता सत्येंद्र मानकर यांजकडून त्यांची नात कु. रचिता राजेश सत्येंद्र मानकर एस.एस.सी. परीक्षेत ८७.५३ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याबद्दल रु. १५१/-

❀ श्री. मदनमोहन शा. नवलकर-कडून नातू नीश तुषार नवलकर एस.एस.सी.त ८८ टक्के गुण मिळवून पास झाल्याबद्दल रु. १०१/-

❀ श्रीमती प्रभा प्रभात नवलकरकडून त्यांची नात भक्ती प्रणवेश धैर्यवान एस.एस.सी. झाल्याबद्दल रु. १०१/-

❀ सौ. आश्लेषा महेंद्र किर्तीकरकडून सदस्यत्व ३५०/-

## पाठारे प्रभू चॅरिटीझ

संस्थेतर्फे सर्व सदस्यांना नुकतेच एक बातमीपत्र पाठवले गेले. त्यात चॅरिटीझच्या सर्व विशेष उपक्रमांची सविस्तर माहिती आहे. २८ जून ०९रोजी झालेल्या चॅरिटीझच्या सभेत श्री. अजित मोरोबा विजयकर यांची एकमताने अध्यक्ष म्हणून फेरनिवड झाली. त्याबद्दल श्री. अजित यांचे मन:पूर्वक अभिनंदन. ही नेमणूक २००९ ते २०१२ या कालावधीसाठी आहे. खात्री आहेच की या काळात ही संस्था आणखी भरभराटीस येईल.

## परीक्षेतील सुयश

### एस.एस.सी.

श्री. हर्ष संदेश देसाई , ९३ टक्के
कु. रचिता राजेश मानकर
५६९/६५०, ८३.५३ टक्के
श्री. नीश तुषार नवलकर, ८८ टक्के
कु. सायली मिलींद धराधर
६०५/६५०, ९१.८४५टक्के
कु. प्रियंका (पूजा) मुकुल वाझकर
३४५/६००
श्री. अनीष मिलींद गोरक्षकर
८१.३३टक्के
आमचे लेखक कु. मुकुंद अजिंक्य
यांचा नातू अनीष तेंडुलकर,
८३.०५टक्के

### एम.बी.ए.

श्री.आधार संदीप लालसेन कोठारे
६५टक्के
श्री. परज बन्सी धुरंधर, ६६ टक्के

## अभिनंदन

❀ आमचे लेखक श्री. नंदकुमार कृ. विजयकर यांचा सत्तरावा वाढदिवस साजरा झाला. त्यांच्या 'सलशिरा'ला लेखणीला आणखी आणखी धुमारे फुटोत, ही सदीच्छा. वाढदिवसाच्या शुभेच्छा.

❀ पाठारे प्रभू भगिनी समाजाच्या अध्यक्षा सौ. वृंदा शाम जयकर यांचाही ३ ऑगस्ट रोजी सत्तरावा वाढदिवस साजरा झाला. 'अजून यौवनात मी' असणाऱ्या वृंदाताईंना त्यांच्या सर्व समाजकार्यासाठी आणि संसारसुखासाठी मन:पूर्वक शुभेच्छा.

❀ प्रतिभा पाटील- पी. पी. पाठारे प्रभू- पी. पी. भारताच्या राष्ट्रपती मध्यंतरी मुंबईत आल्या तेव्हा दोन 'पी. पी.' नी त्यांच्यासाठी आपले कसब पणाला लावले. डॉ. प्रफुल्ल गजानन विजयकर आणि त्यांचा सुपुत्र डॉ. अंबरीश यांनी प्रतिभाताईंच्या प्रकृतीची चिकीत्सा केली. कलाकार श्री. पांडुरंग कोठारे आणि त्यांचे सुपुत्र श्री. सुनील या दोन कलाकारांनी प्रतिभाताईंच्या आगमना-साठी सुशोभिकरण केले. विजयकर आणि कोठारे 'पी. पीं.'चे अभिनंदन.

❀ श्री. महेश कोठारे यांनी चित्रवाणी-वर ताबा मिळवून नवीन मालिका-निर्मिती केली आहे. अभिनंदन.

❀ डॉ. सदाशिव गोरक्षकर यांचा अंबरनाथ येथील पुरातन शिवमंदीर वास्तूत सत्कार करण्यात आला. अनेक नामवंतांसह त्यांच्या होणाऱ्या सत्काराची छबी वृत्तपत्रातून झळकली. अभिमान वाटला. आनंद झाला.


**प्रकास्व कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चव-दार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.* संपर्क : **प्रवीण धुरंधर** डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९. फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८


**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

०२-०७-०९ सौ. नम्रता समशेर गरूड (पूर्वाश्रमीची नम्रता राजन जयकर), पुत्र, कुलाबा
०८-०७-०९ श्री. आशीष दिलीप व्यवहारकर, कन्या बोरीवली,
११-०७-०९ श्री. रोहित प्रकाश भगवान मानकर, पुत्र, वांद्रे
१२-०७-०९ सौ. विदुला श्रीनल शरद कोठारे, पुत्र, मालाड
१५-०७-०९ सौ. अनुराधा सीमित सुभाष देसाई, कन्या, ठाणे
५-८-०९ सौ. पूजा प्रणव शिवनाथ देसाई, कन्या, वांद्रे

### नारळसाखर दिला

२६-७-०९ श्री. संकेत रंजनलाल धुरंधर कु. चैत्राली शेखर अजिंक्य
३१-०७-०९ श्री. रोहन ज्योतिंद्र अजिंक्य कु. बिंदीया बालम राणे

### विवाह सुवर्ण महोत्सव

श्री. दत्तकुमार भोलानाथ नवलकर सौ. सुहासिनी दत्तकुमार नवलकर

### नांदा सौख्यभरे

डॉ. दर्शना दिलीप शरदकुमार कोठारे डॉ. स्वप्नील उल्हास राणे (आंतर्ज्ञातीय)

### मरण

०८-०७-०९ श्रीमती शालिनी गोरक्षकर, ८२ वर्षे ठाणे

(पान ६, कॉलम ३ वर)

सेंजित यांनी अतिशय मुद्देसूद व समर्पक शब्दांत सफाईने केले. समाजाचे विश्वस्त श्री. माधव जयकर यांनी आषाढी एकादशीचे व अभंग यात्रेचे महत्त्व विशद केले.

सर्व उपस्थितांना समाजाध्यक्षा सौ. प्रमिला तळपदेंकडून कॉफी व समाजाच्या विश्वस्त सौ. वृंदा जयकर यांनी आपल्या ७०व्या वाढदिवसा-निमित्त आणि नात कु. अपेक्षा राणे हिच्या एम्.बी.ए. (अमेरिका) परीक्षेतील धवल यशाबद्दल पेढे दिले. विश्वस्त श्री. मधुकर तळपदे यांनी आभार मानले.

सौ. प्रमिला तळपदे, नीता सेंजित, स्वाती जयकर, उत्तरा कोठारे, साया नवलकर, नूतन कीर्तिकर, रेणुका धुरंधर, अक्षदा तळपदे, मधु धुरंधर, रंजनी कोठारे, क्षमा कोठारे, आसावरी धुरंधर, पूजा अजिंक्य, वीणा अजिंक्य, देवश्री विजयकर, रश्मी व्यवहारकर, प्रवीण वेलकर, केदार गोरक्षकर, सीमा कीर्तिकर, चिंतामणी कीर्तिकर, हेमा जयकर, ऋग्वेद करंबेळकर, किनल कोठारे, श्रीमती. सुरूपा राणे/देवरुखकर. या गायकांनी अभंगयात्रा यशस्वी केली. गायकांचे अभिनंदन.

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाचा ९५ वा स्थापना दिन रविवार दिनांक १३ सप्टेंबर रोजी दुपारी ४.३० वाजता पाठारे प्रभु सोसायटीचे सांस्कृतिक केंद्र, प्रभुनगर, १२वा रस्ता, 'खार (प.) येथे सुप्रसिद्ध अभिनेत्री व गायिका सौ. नयना आपटे-जोशी ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात येईल. अभिनेत्री कु. उर्मिला कानिटकर (असंभव) ह्याही उपस्थित राहणार आहेत. तरी त्या दिवशी होणाऱ्या संगीत व नृत्यस्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी भाग घ्यावा असे आवाहन महिला समाजातर्फे करण्यात आले आहे.

महिला समाजाचा वार्षिक अहवाल दरवर्षीप्रमाणे सभासद भगिनींना पाठवण्यात आला. महिला समाजाचे भरगच्च कार्यक्रम आणि निधी संकलन वाखाणण्याजोगे आहे.


***JOGESHWARI RESORT***

[illegible]

Under ISHWARI & VIDYADHAR CHARITABLE TRUST No. 14, Divya Hilltop Cottages, Nangargaon, LONAVALA.
Fully furnished Double Bedroom Hall & Kitchen Units Equipped with Gas, Stove, Utensils and Refrigerators available on daily charge basis.
Special concessions available on request for Womens' and Children's Institutions, Aged, Disabled or for other justifiable reasons and medical certificates. Booking made on phone as below. Also available, at the Mumbai address, Wheel Chair, Walkers, Crutches, against refundable deposits only.

Trustees: PRAMILA & MADHUKAR TALPADE
102, ``PRIYA" Raviraj Oberoi Complex, SAB T. V. Lane,
New Link Road, Andheri(W), Mumbai-400 053.
Tel. : 2630 3902 / 2630 3906 Mobile : 9821447675
Booking Mobile : 09823884094/09422543614